**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी**
**<u>योजनेंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योंजना</u>**
**प्रशासकीय व तांत्रिक बाबींच्या निधीच्या खर्चाबाबत**
**तसेच यंत्रणांना कामाचे उद्दिष्ट देणेबाबत.**

महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग,
शासन निर्णय क्रमांक:मग्रारोहयो-२०१०/प्र.क्र.४८/रोहयो-१०
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ५ जून,२०१०

संदर्भ : १) शासन निर्णय नियोजन विभाग, क्रमांक :मग्रारोहयो-२००६/ प्र.क्र.१०४/ रोहयो-१०, दिनांक १९ ऑक्टोबर, २००६.

२) शासन निर्णय नियोजन विभाग, क्रमांक :रोहयो-२००७/ प्र.क्र.२४/ रोहयो-१०, दिनांक १४ ऑगस्ट, २००७.

३) शासन निर्णय नियोजन विभाग, क्रमांक :रोहयो-२००७/ प्र.क्र.२४/ रोहयो-१०, दिनांक २३ ऑगस्ट, २००७.

४)शासन निर्णय नियोजन विभाग,क्रमांक : मग्रारोहयो-२००६/प्र.क्र.१०४/रोहयो-१०, दिनांक १२ नोव्हेंबर, २००७.

५) शासन निर्णय नियोजन विभाग,क्रमांक : मग्रारोहयो-२००७/प्र.क्र.२४/रोहयो-१०, दिनांक २७ डिसेंबर, २००७.

६) शासन निर्णय नियोजन विभाग,क्रमांक : मग्रारोहयो-२००७/प्र.क्र.२४/रोहयो-१०, दिनांक २८ डिसेंबर, २००७.

७) शासन निर्णय नियोजन विभाग,क्रमांक : रोहयो-२००७/प्र.क्र.२४/रोहयो-१०, दिनांक ७ जानेवारी, २००८.

८) शासन निर्णय नियोजन विभाग,क्रमांक : मग्रारोहयो-२००७/प्र.क्र.७६/रोहयो-१०, दिनांक २३ जानेवारी. २००८.

९) शासन निर्णय नियोजन विभाग,क्रमांक : रोहयो-२००७/प्र.क्र.२४/रोहयो-१०, दिनांक ७ फेब्रुवारी. २००८.

१०) शासन निर्णय नियोजन विभाग, क्रमांक :मग्रारोहयो-२००६/ प्र.क्र.१०४/ रोहयो-१०, दिनांक १३ मार्च, २००८.

११) शासन निर्णय नियोजन विभाग, क्रमांक : मग्रारोहयो-२००८/प्र.क्र.३/रोहयो-१०, दिनांक ५ जून, २००८.

१२) शासन निर्णय नियोजन विभाग, क्रमांक :मग्रारोहयो-२००६/ प्र.क्र.१०४/ रोहयो-१०, दिनांक १४ ऑगस्ट, २००८.

१३) शासन निर्णय नियोजन विभाग, क्रमांक :मग्रारोहयो-२००६/ प्र.क्र.१०४/ रोहयो-१०, दिनांक २२ ऑक्टोबर, २००८.

१४) शासन पत्र क्रमांक मग्रारोहयो २००८/प्र.क्र.१९/रोहयो-१०, दिनांक २० फेब्रुवारी, २००९.

१५) केंद्र शासनाचे पत्र क्र .जे-११०११/१८/२००७/एनआरइजीए, दिनांक.१८ मार्च,२००९

१६) शासन पत्र क्रमांक: मग्रारो २००९/खर्च/प्र.क्र.०७/रोहयो -७, दिनांक १८ मे,२००९

**प्रस्तावना :-**

शासन निर्णय नियोजन विभाग,क्रमांक : मग्रारोहयो-२००६/प्र.क्र.१०४/रोहयो-१०, दिनांक १२ नोव्हेंबर, २००७ व शासन पत्र क्र.मग्रारोहयो २००८/प्र.क्र.१९/रोहयो १०, दि.२०/२/२००९ द्वारे महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीसाठी करावयाच्या प्रशासकीय व तांत्रिक बाबींच्या खर्चासाठी ७ % निधी वापरण्याची परवानगी देण्यात आली होती. त्यानंतर केंद्र शासनाने प्रशासकीय खर्च शीर्षाखाली आणखी २% वाढवून दिले. त्याबाबत शासन पत्र क्रमांक मग्रारो २००९/खर्च/प्र.क्र.०७/रोहयो -७, दिनांक १८ मे,२००९ द्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात आले आहे.

२. महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना राज्यात इतर राज्याप्रमाणे प्रभावीपणे राबविण्याबाबत मंत्रिमंडळाची एक उप समिती गठीत करण्यात आली होती. या उप समितीच्या बैठकीच्या वेळेस काही जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, विभागीय आयुक्त यांचेसह चर्चा केली. चर्चेच्या वेळी असे निदेश देण्यात आले की, या योजनेच्या अंमलबजावणीसाठी ग्राम पातळीवर असलेल्या यंत्रणांचे आणखी बळकटीकरण किंवा त्यांना आणखी प्रोत्साहन देण्याची गरज आहे. त्यासाठी सध्या असलेली प्रशासकीय बाबीच्या खर्चाची मर्यादा ९% वरुन १२ % पर्यंत करण्यासाठी उपसमितीने शिफारस केली. सदर ३ % वाढीव निधी राज्य रोजगार हमी योजनेच्या निधीमधून द्यावा अशीही उपसमितीने शिफारस केली होती. हया शिफारशी मंत्रिमंडळाने मान्य केल्या आहेत. सदर निर्णय विचारात घेता शासन आता पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**शासन निर्णय :-**

१. प्रशासकीय व तांत्रिक बाबीच्या खर्चाची मर्यादा ९% वरुन १२%पर्यंत करण्यात येत असून वाढीव ३% निधी राज्य शासनाच्या निधीमधून उपलब्ध केला जाईल.

२. **प्रशासकीय निधीचे वाटप**

**प्रशासकीय निधीचे वाटप** : १२% चे वाटप खालीलप्रमाणे राहील.

(१) ५.७५% ग्राम पंचायत आणि योजना अंमलबजावणी करणारी इतर शासकीय यंत्रणा,

(२) २.२५% गट विकास अधिकारी कार्यालयासाठी व तहसिल कार्यालयासाठी,

(३) ४% जिल्हाधिकारी कार्यालय, मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय, विभागीय आयुक्त कार्यालय आणि राज्य शासन (यामधून ०.२५% शासन व ०.२५%विभागीय आयुक्त स्तरावर अनुषंगिक खर्चासाठी अनुज्ञेय राहील.)

३. **ग्रामपंचायंत आणि शासकीय यंत्रणांनी करावयाचा प्रशासकीय निधीचा वापर :**

ग्राम पंचायतीकडे किंवा शासकीय यंत्रणांकडे उपलब्ध होणारा ५.७५ % निधी खालीलप्रमाणे वापरण्यात यावा.

३.१ **ग्राम पंचायतीसाठी -**

(अ) २.२५% ग्राम रोजगार सेवकासाठी,

(ब) ३ % तांत्रिक पॅनेल्ससाठी,

(क) ०.५ % इतर प्रशासकीय खर्चासाठी

३.२ **शासकीय यंत्रणांसाठी -**

शासन ग्राम पंचायत वगळून इतर शासकीय यंत्रणा ज्या योजनांची अंमलबजावणी करणार आहेत त्यांना मदत करण्यासाठी मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचे ठरविण्यात आले आहे. (शासकीय यंत्रणांनी महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीसाठी किती प्रमाणात आणि कोणती प्रक्रिया अवलंबून मनुष्यबळ घेणार आहेत या प्रकारचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहेत.)

हे मनुष्यबळ दोन प्रकारचे राहील.

(१) ग्राम रोजगार सेवकासारखा एक सहाय्यक जो शासकीय यंत्रणांना योजनांच्या अंमलबजावणीमध्ये पूर्णपणे मदत करेल. त्यांनी मजुरांना गोळा करणे, त्यांना काम देणे, वेगवेगळया नोंदवहया ठेवणे, पगार देणे, इ. या योजना सहाय्यकाला ग्राम रोजगार सेवकासारखे कामाच्या खर्चाच्या २.२५% निधी मिळेल.

(२) शासकीय यंत्रणांना सर्वेक्षण, अंदाजपत्रके तयार करणे, अंदाजपत्रकावर तांत्रिक मान्यता घेणे, अंमलबजावणीच्या वेळेस मोजमाप करणे, कामाच्या गुणवत्तेकडे लक्ष देणे इ. कामांसाठी तांत्रिक पॅनेल उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी ३ % निधी आहे.

(३) ग्रामरोजगार सेवक व तांत्रिक पॅनेलचे काम कंत्राट पध्दतीवर एकत्रितपणे कोणत्याही स्वयंसेवी संस्थेस नेमून देता येऊ शकेल. या संस्थांनाही एकत्रितपणे ५.२५% निधी देय असेल.

(४) शासकीय यंत्रणांच्या प्रशासकीय खर्चासाठी ०.५ % निधी वापरू शकेल.

## ४. गट विकास अधिकारी कार्यालये आणि तहसिल कार्यालये :

आजपर्यंत योजनाअंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी (शासकीय यंत्रणांसाठी) आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायतीसाठी) यांना होते. शासनाने या ग्रामपंचायतीसाठी, गट विकास अधिकाऱ्यांना आणि इतर शासकीय कार्यालयासाठी तहसिलदारांना प्रशासकीय मान्यतेचे अधिकार देण्याचे ठरविले आहे. याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहेत.

हे अधिकार दिल्यानंतर गट विकास अधिकारी आणि तहसिल कार्यालयामध्ये काही प्रमाणात कामामध्ये वाढ होईल. त्यांना काही प्रमाणात अतिरिक्त मनुष्यबळ द्यावे लागणार आहे. (गट विकास अधिकारी कार्यालये व तहसिल कार्यालयामध्ये किती प्रमाणात व कोणती प्रक्रिया अवलंबून अतिरिक्त मनुष्यबळ द्यावयाचे आहे याबाबतचे स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.) या मनुष्यबळासाठी आणि इतर प्रशासकीय खर्चासाठी गट विकास अधिकारी कार्यालये आणि तहसिल कार्यालयाला २.२५% पर्यंत प्रशासकीय खर्च करण्याची मुभा राहील.

५. जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, विभागीय आयुक्त आणि राज्य शासनासाठी उरलेल्या ४% मधून प्रशासकीय खर्च, प्रसिध्दी, प्रशिक्षण, MIS Data Feeding आणि इतर पायाभूत सुविधा उपलब्ध राहतील.

६. **<u>प्रशासकीय खर्चाच्या निधीचे हिशोब :</u>**

(१) ग्रामपंचायत आणि इतर शासकीय यंत्रणांना उपलब्ध होणाऱ्या ५.७५% निधीपैकी ३ % निधी प्रत्येक कामाच्या अंदाजपत्रकामध्ये तरतूद करून MIS अंतर्गत मटेरियल कॉम्पोनंट मध्ये त्याची नोंद करावी व उरलेल्या २.२५% प्रशासकीय निधीअंतर्गत MIS मध्ये नोंद करावी.

(२) गट विकास अधिकारी कार्यालये किंवा तहसिल कार्यालयासाठी उपलब्ध होणाऱ्या २.२५% निधी MIS अंतर्गत प्रशासकीय खर्चाच्या शीर्षाखाली नोंद करावी. त्याचप्रमाणे, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, विभागीय आयुक्त आणि राज्य शासनासाठी राखून ठेवलेले ४ % निधी प्रशासकीय खर्चाअंतर्गत MIS मध्ये नोंद करावी.

७. **<u>कामे शेल्फवर आणण्याचे उद्दिष्ट</u>**

आगामी आर्थिक वर्षात किती मजूरांकडून कामाची मागणी केली जाईल व त्यानुसार किती मनुष्यदिन निर्माण होतील हे विचारात घेऊन त्या वर्षाचे लेबर बजेट ग्रामसभेच्या मान्यतेने ग्रामपंचायतीकडून तयार केले जाते. तसेच आगामी आर्थिक वर्षात हाती घ्यावयाच्या कामांच्या प्राथम्य क्रमासह कामांची मंजूरी ग्रामसभेद्वारा ग्रामपंचायतीकडून दिली जाते व सदर लेबर बजेट व कामांच्या आराखडयास पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेची मान्यता घेतली जाते.

(७.१) वरील प्रमाणे लेबर बजेट तयार करताना व कामांचा आराखडा तयार करतांना यापुढेही पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

१) आगामी आर्थिक वर्षात निर्माण होणाऱ्या मनुष्यदिनांपैकी चालू कामावर किती मजूरांना रोजगार उपलब्ध केला जाऊ शकेल ते प्रथम निश्चित करावे व त्यानुसार मजूरांना रोजगार उपलब्ध करावा.

२) त्यानंतर जे मनुष्यदिन शिल्लक राहतील त्याकरिता शेल्फवरील मंजूर कामे हाती घेण्यात यावीत.

३) चालू कामे व शेल्फवरील कामे पूर्ण झाल्यानंतर जे मनुष्यदिन शिल्लक राहतील त्या मर्यादेतच लेबर बजेट/मजूर आराखडा यानुसार नवीन कामांना मंजूरी देण्यात यावी.

(७.२) या उद्दिष्टांच्या मर्यादेत नवीन कामे हाती घेण्यासाठी/अंदाजपत्रक तयार करण्यासाठी ग्रामपंचायत व यंत्रणांच्या तांत्रिक पॅनेलना द्यावयाच्या ३ % निधीमधून १ % रक्कम अग्रिम स्वरुपात देण्यात यावी व उर्वरित २% रक्कम काम झाल्यावर देण्यात यावी. मात्र नवीन अंदाजपत्रके वर नमूद केल्याप्रमाणे उर्वरित मनुष्यदिनाच्या मर्यादेतच केली जातील याची दक्षता घ्यावी.

सदर आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २२७/१०/व्यय-८, दि.३ जून,२०१० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१००६०५१३५५५२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

( बा.बा.नारायणकर )
उप सचिव (रोहयो)

प्रति,

१) मा.राज्यपालांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव
५) सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक,
७) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव.
८) महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता) १, महाराष्ट्र, मुंबई.

९) महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता) २, महाराष्ट्र, नागपूर.
१०)महालेखापाल (लेखा परिक्षा) १, महाराष्ट्र, मुंबई.
११)महालेखापाल (लेखा परिक्षा) २, महाराष्ट्र, नागपूर.
१२)अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१३) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१४) वित्त विभाग (विनियम)(अर्थसंकल्प) व (व्यय-१).
१५) सर्व विभागीय आयुक्त तथा रोजगार आयुक्त, मग्रारोहयो
१६) आयुक्त, (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१७) सर्व जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा जिल्हाधिकारी.
१८) सर्व सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद.
१९) सर्व विशेष कार्यकारी अधिकारी व उप विकास आयुक्त (मग्रारोहयो).
२०) सर्व उप जिल्हाधिकारी (रोहयो).
२१) सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
२२) मुख्य अभियंता, ल.पा. (स्था.स्तर) पुणे.
२३) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग.
२४) सर्व अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग.
२५) प्रधान मुख्य वन संरक्षक , महाराष्ट्र राज्य, नागपूर
२६) संचालक, फलोत्पादन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२७) संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२८) उप सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, रोहयो समिती, महाराष्ट्र विधानमंडळ, विधान भवन, मुंबई.
२९) मुख्य अभियंता व सह सचिव (मग्रारोहयो).
३०) सर्व उपसचिव, अवर सचिव व कक्ष अधिकारी (मग्रारोहयो प्रभाग) व जलसंधारण विभाग.
३१) सर्व उप विभागीय अधिकारी (महसूल).
३२) सर्व मंत्रालयीन विभाग
३३) वित्त विभाग/व्यय -८ शाखा, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
३४) कक्ष अधिकारी, रोहयो -१, सारसंग्रह
३५) निवडनस्ती, रोहयो-१०.

----------------